D:\College Inspection file\10. Final Orders Action Taken\Letter

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra, India**
NAAC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
acadsection@bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/संलग्न/पीबीजी/आदेश/२०२२-२३/ 28218-25 दि. ०४-०५-२०२३

**प्रति,**
**प्राचार्य,**
**[EJ90628] सी.पी. कॉलेज ऑफ एज्युकेशन,**
**भक्त नगर, रेवगाव रोड,**
**ता. जालना, जिल्हा जालना.**

**विषय :- महाविद्यालयातील पायाभूत सुविधांची पाहणी/ तपासणीच्या अनुषंगाने पारित आदेशाबाबत.**
**संदर्भ :-** १)चौकशी समिती नियुक्त करणे संदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १२ (१४) (क) अन्वये करण्यात आलेली तरतूद.
२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६,कलम १२ (१४) (च) अन्वये द्रव्यदंड व प्रवेश बंद करणेबाबत करण्यात आलेली तरतूद.
३) मा.कुलगुरु महोदयांनी पारित केलेले आदेश (प्रपत्र-१) दि. ०४ मे, २०२३.

**महोदय/ महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा.कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, **[EJ90628] सी.पी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, भक्त नगर, रेवगाव रोड, ता. जालना, जिल्हा जालना** या महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या एकूण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमापैकी संदर्भ क्र. (३) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी पारित केलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १२ (१४) (च) अन्वये विहित केल्यानुसार आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

प्रस्तूत प्रकरणी संदर्भ क्र. (३) प्रपत्र-१ अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी पारित केलेल्या आदेशाचे महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने व महाविद्यालयाने अनुपालन करणे आवश्यक असून सोबत आदेशाची प्रत पुढील कार्यवाहीस्तव जोडली आहे.

सोबत:- मा.कुलगुरु महोदयांचे आदेश.

**कुलसचिव**

**प्रतिलिपी :**

१. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण,औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर
३. संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना या पत्राची एक प्रत देवून कळविण्यात येते की, उक्त प्रकरणी मा.कुलगुरु महोदयांनी पारित केलेले आदेश पालक व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास यावे म्हणून विद्यापीठाच्या संकेत स्थळावर तात्काल प्रसिद्ध करण्यात यावे.

४. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना या पत्राची एक प्रत देवून कळविण्यात येते की, उक्त प्रकरणी मा.कुलगुरु महोदयांनी पारित केलेले आदेश पालक व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास यावे म्हणून बातमी स्वरुपात वर्तमानपत्रात प्रकाशीत प्रसिद्ध करण्यात यावे.

५. अध्यक्ष/ सचिव, **EJ90628] सी.पी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, भक्त नगर, रेवगाव रोड, ता. जालना, जिल्हा जालना** यांना माहितीस्तव अग्रेषित.

६. व्यवस्थापक, एम.के.सी.एल. परीक्षा विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर

७. कक्ष अधिकारी, पात्रता विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर

स्वा/-

**कुलसचिव**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद-४३१००४ महाराष्ट्र (भारत)

नॅक 'अ' श्रेणी प्राप्त

प्रा.(डॉ.) प्रमोद येवले

एम. फार्म., पीएच.डी., डी.बी.एम.

कुलगुरु

दूरध्वनी : ०२४०-२४०३३९९, २४०३४००

कार्यालय : ०२४०-२४०३१११२

E-mail : vc@bamu.ac.in

Website : www.bamu.ac.in


## आदेश

**(प्रपत्र-१)**

**संदर्भ :-**

**०१) मा. कुलगुरु महोदयांना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (क) अन्वये चौकशी समिती नियुक्त करणेबाबत करण्यात आलेली तरतूद.**

**०२) चौकशी समिती नियुक्त का करण्यात येवू नये? याबाबत विद्यापीठाने निर्गमित केलेली नोटीस / पत्र दि. १९-१२-२०२२**

**०३) चौकशी समिती नियुक्त करणेबाबत आपल्या महाविद्यालयाने / व्यवस्थापनाने सादर केलेला खुलासा दि २३-१२-२०२२.**

**०४) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (ख) अन्वये मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशानुसार डॉ. चेतना सोनकांबळे (अधिष्ठाता) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेली समिती दिनांक ०७-०१-२०२३**

**०५) चौकशी समितीने महाविद्यालयास दिलेली भेट दिनांक १३-०४-२०२३**

**०६) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (ग) अन्वये चौकशीच्या वेळेस व्यवस्थापनाचे अध्यक्ष / सचिव किंवा प्रतिनिधी उपस्थित राहणेबाबत विद्यापीठाने दिलेले आदेश दिनांक ०७-०१-२०२३**

**०७) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (घ) अन्वये चौकशी समितीच्या निष्कर्षानुसार महाविद्यालयाने खुलासा सादर करावे, याबाबत विद्यापीठाचे पत्र दिनांक २०-०४-२०२३.**

**०८) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (घ) अन्वये विहित केल्यानुसार चौकशी समितीच्या निष्कर्षाप्रमाणे महाविद्यालय / व्यवस्थापनाने सादर केलेला खुलासा अप्राप्त आहे.**

**०९) सुनावणीस उपस्थित राहणेबाबत मा. कुलगुरु महोदयांनी दिनांक २४-०४-२०२३ रोजी दिलेल्या आदेशानुसार सुनावणीस दिनांक ०२-०५-२०२३ रोजी उपस्थित राहणेबाबत विद्यापीठाचे पत्र दिनांक २६-०४-२०२३.**

**१०) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० (४) अन्वये विहित केल्यानुसार पात्र दिनांकास नॅक मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन न झालेल्या महाविद्यालयांचे विहित केलेल्या प्रक्रियेने संलग्नीकरण रद्द करणेबाबत विद्यापरिषदेने घेतलेला निर्णय दिनांक ३० नोव्हेबर, २०२१.**

**११) विस्तारीकरणा अंतर्गत शासनाने मंजूर केलेल्या अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी एका वर्षाच्या आत अर्ज करुन नॅक मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन करणे अनिवार्य असणेबाबत शासन निर्णय दिनांक १५ जून, २०२१.**

**१२) नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता देणे संदर्भात निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सर्व संबंधित महाविद्यालयांनी विहित कालमर्यादेत / पात्र दिनांकास नॅक मूल्यांकन करणेबाबत शासन निर्णय दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१.**

**१३) नियमित प्राचार्य व अध्यापकांची नियुक्ती करणे व नॅक मूल्यांकन करणेबाबत विद्यापीठाचे परिपत्रक दि २८ मार्च, २०२२, २७ जुलै, २०२२ व विद्यापीठाचे पत्र दिनांक ०५-०५-२०२२, दि. ०७-०६-२०२२.**

**१४) प्राचार्य नियुक्त करणेबाबत विद्यापीठाचे परिपत्रक्र दिनांक २०-०४-२०२३**

**१५) पदव्युत्तर अभ्यासक्रमास अध्यापकासंदर्भात विद्यापीठाचे परिपत्रक्र दिनांक १९-०४-२०२३**

**सी. पी. अध्यापक महाविद्यालय, जालना** या महाविद्यालयाकडे सुरु असलेल्या पदवी / पदव्युत्तर अभ्याक्रमाकरिता N.C.T.E. या केंद्रीय प्राधिकरणाच्या अधिसुचनेनुसार नियमामध्ये विहित केल्याप्रमाणे पायाभुत सुविधांची पाहणी / तपासणी करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (क) अन्वये विहित केल्यानुसार कुलगुरुंना प्राप्त असलेल्या

अधिकारात विद्यापीठाच्या अधिष्ठाता **डॉ. चेतना सोनकांबळे** यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिति नियुक्त करण्यात आलेली होती. प्रस्तुत समितीने **दिनांक १३-०४-२०२३** रोजी सदरील महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा व मानवसंसाधन यांची चौकशी केली. सदरील चौकशी समितीने **दिनांक १३-०४-२०२३** रोजी या कार्यालयास सविस्तर अहवाल सादर केला. तद्अनुषंगाने चौकशी समितीचा निष्कर्ष महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास **दिनांक २०-०४-२०२३** रोजी कळवून खुलासा मागविला असता महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने उक्त प्रकरणी **दिनांक ०२-०५-२०२३** रोजी खुलासा उशिराने सादर केला. याप्रकरणी प्रस्तुत महाविद्यालयास त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी दिनांक ०२-०५-२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुत प्रकरणी चौकशी समितीच्या शिफारशी व नियमातील तरतूदी लक्षात घेता मी **प्राध्यापक डॉ. प्रमोद येवले, कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (च) अन्वये विहित केल्याप्रमाणे प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

१) प्रस्तुत महाविद्यालयाकडे N.C.T.E या केंद्रीय प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या अधिसुचनेनुसार उपलब्ध पायाभुत सुविधा व मानवसंसाधनाची उणीव लक्षात घेता सदरील महाविद्यालयाकडे सुरु असलेल्या एकुण पदवी (बी.एड्.) अभ्यासक्रमाची ५० प्रवेश क्षमतेप्रमाणे दोन तुकडया व एम.एड. अभ्यासक्रमाच्या तुकडी प्रवेश क्षमता ५० शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी नवीन प्रवेश स्थगित करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत प्रकरणी PAR व NAAC या प्राधिकरणा मार्फत मूल्यांकनासाठी दोन महिन्याच्या आत अर्ज करुन तसा अहवाल विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे तसेच आपणास उक्त प्रकरणी असे ही अवगत करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० (४) अन्वये करण्यात आलेली तरतूद व विद्यापरिषदेने दिनांक ३० नोंव्हेबर २०२१ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार पात्र दिनांकास PAR व NAAC या प्राधिकरणामार्फत मूल्यांकन/ पुनर्रमूल्यांकन न केल्यास महाविद्यालयांना संलग्निकरण देण्यात येणार नाही, याची गांर्भियाने नोंद घेणे आवश्यक आहे.

३) प्रस्तुत महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या **बी.एड् या अभ्यासक्रमाची ५० प्रवेश क्षमतेप्रमाणे दोन तुकडया व एम.एड. अभ्यासक्रमाची ५० प्रवेश क्षमतेप्रमाणे एक तुकडी या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी** सदरील महाविद्यालयामध्ये N.C.T.E या केंद्रीय प्राधिकरणाच्या नियमानुसार पायाभुत सुविधा उपलब्ध नसून कार्यभारानुसार तसेच विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकाप्रमाणे आवश्यक अध्यापकांची नियुक्ती न केल्यामुळे **शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून नवीन प्रवेश बंद करण्याचे निर्देश महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास तसेच महाविद्यालयीन प्रशासनास देण्यात येत आहे.**

४) प्रस्तुत महाविद्यालयाकडे सुरु असलेल्या **बी.एड् या अभ्यासक्रमाची ५० प्रवेश क्षमतेप्रमाणे दोन तुकडया व एम.एड. अभ्यासक्रमाची ५० प्रवेश क्षमतेप्रमाणे एक तुकडी या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी** शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करीता कार्यभारानुसार अनुज्ञेय अध्यापक N.C.T.E या केंद्रीय प्राधिकरणाच्या नियमानुसार विद्यापीठाच्या विहित निवड समिती मार्फत / अल्पसंख्यांक निवड समिती मार्फत विहित केलेल्या प्रक्रियेने विहित मुदतीत नियुक्त न केल्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२० (०१) ते (०४) अन्वये विहित केल्यानुसार संलग्नीकरण रद्द करणेबाबत प्रक्रिया सुरु करण्यासाठी सदरील महाविद्यालयाच्या प्रस्ताव आगामी अधिष्ठाता मंडळ व विद्यापरिषदेसमोर तात्काळ सादर करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणी अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार विहित केलेल्या प्रक्रियेने विहित मुदतीत विद्यापरिषद किंवा मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशानुसार सदरील महाविद्यालयाच्या संलग्नीकरणाबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल N.C.T.E. या केंद्रीय प्राधीकरणास व महाराष्ट्र शासनाच्या CET सेल या विभागास तात्काळ कळविण्यात यावा.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद-४३१००४ महाराष्ट्र (भारत)

नॅक 'अ' श्रेणी प्राप्त

**प्रा.(डॉ.) प्रमोद येवले**

एम. फार्म., पीएच.डी., डी.बी.एम.

कुलगुरु

दूरध्वनी : ०२४०-२४०३३९९, २४०३४००

कार्यालय : ०२४०-२४०३१११२

E-mail : vc@bamu.ac.in

Website : www.bamu.ac.in


५) प्रस्तुत महाविद्यालयाची स्थापना शैक्षणिक वर्ष २००५ पासून झालेली आहे परंतू महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने नियमित अध्यापकांची विद्यापीठाच्या विहित निवड समिती /अल्पसंख्यांक निवड समिती मार्फत विहित केलेल्या प्रक्रियेने कार्यभारानुसार अनुज्ञेय प्राचार्य व अध्यापकांची N.C.T.E. च्या नियमानुसार नियुक्ती केलेली नाही. तसेच सदरील महाविद्यालयाची इमारत आवश्यक क्षेत्रफळासह अद्ययावत नाही, अद्ययावत प्रयोगशाळा नाही, प्रयोगशाळेचे क्षेत्रफळ नियमानुसार नाही, विद्यार्थी प्रमाणात संगणक संच उपलब्ध नाही, प्रयोगशाळेस लागणारे आवश्यक उपकरणे व साहित्य उपलब्ध नाही, PAR व NAAC मूल्यांकन नाही, अद्ययावत ग्रंथालय नाही, ग्रंथलायामध्ये ग्रंथ संपदा अंत्यत तुटपुंजी आहे तसेच महाविद्यालयाने सादर केलेला लेखा परिक्षण अहवालानुसार (Audit Report) वेतन व इतर सोई सुविधेसाठी अंत्यत कमी व अत्यल्प खर्च केल्याचे आढळून आलेले असल्यामुळे उक्त प्रकरणी सदरील महाविद्यालय कार्यवाहीस पात्र आहे.

६) प्रस्तुत आदेशातील अनुक्रमांक (२) अन्वये विनिर्दिष्टित करण्यात आलेल्या बंद अभ्यासक्रमांबाबत महाविद्यालयाने सहा महिन्याच्या आत विद्यापीठास अनुपालन अहवाल सादर करावे. तद्नंतर महाविद्यालयाची विद्यापीठाकडून तज्ञ समितीद्वारा तपासणी करुन सदरील अभ्यासक्रम पुढे सुरु ठेवावे किंवा कसे, याबाबत विद्यापीठाच्या विद्यापरिषदेद्वारे निर्णय घेण्यात येईल.

७) प्रस्तुत महाविद्यालयातील ज्या अभ्यासक्रमांना / तुकडीस प्रवेश बंद करण्यात आलेले आहे, त्या अभ्यासक्रमाच्या / तुकडीच्या लागू असलेल्या द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम व शैक्षणिक कार्य महाविद्यालयाने आवश्यक त्या अध्यापकांची नेमणूक करुन पूर्ण करणे अनिवार्य आहे तसेच ज्या पदवी अभ्यासक्रमांना लघूशोध प्रबंधाची आवश्यक आहे, असे लघूशोध प्रबंध विद्यापीठ मान्यता प्राप्त अध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करुन तसा अहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावा व संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठातांनी अहवाल तपासून तद्अनुषंगाने सदरील विद्यार्थ्यांना परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात यावी.

८) प्रस्तुत महाविद्यालयाच्या व्यवस्थापन व प्रशासनाने खोटी व बनावट माहितीबाबतचे दस्ताऐवज समितीस अथवा विद्यापीठास सादर केल्याचे आढळून आल्यास नियमानुसार सर्व संबंधितावर पोलिसामध्ये तक्रार करण्यात यावी.

९) प्रस्तुत महाविद्यालयाच्या संदर्भात विद्यापीठाने पारित केलेले आदेश विद्यार्थी व पालकांच्या माहितीसाठी परिपत्रकाद्वारे प्रसिध्द करण्यात यावे, तसेच सदरील आदेश विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहितीसाठी प्रसिध्द करण्यात यावे. तद्अनुषंगाने सदरील अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांनी प्रवेश घेवू नये, विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यास याबाबत विद्यापीठ जबाबदार राहणार नाही, असेही सदरील परिपत्रकात नमुद करुन प्रसिध्दी देण्यात यावी.

१०) प्रस्तुत प्रकरणी सदरील महाविद्यालयास CET या प्रवेश प्रक्रिय मार्फत प्रवेश प्रक्रियेमध्ये सदरील महाविद्यालयामध्ये प्रवेश बंद बाबत विद्यापीठाने केलेल्या कार्यवाही नुसार वस्तूस्थिती दर्शक अहवाल महाराष्ट्र शासन व N.C.T.E या केंद्रीय प्राधिकरणास तात्काळ कळविण्यात यावे.

११) प्रस्तुत महाविद्यालयास सोई सुविधा, प्राध्यापक व इतर बाबी नियमामध्ये विहित केल्यानुसार नसतांना सुध्दा सदरील महाविद्यालयास वार्षिक संलग्नीकरण एवढया सर्व अभ्यासक्रमांना कोणत्या नियमानुसार संलग्नीकरण मान्यता देण्यात आलेली आहे, या संदर्भात तत्कालीन काळातील सर्व चौकशी समित्यांची चौकशी करुन त्यास जबाबदार असलेले समिती सदस्य व विद्यापीठ अधिकारी यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.

**प्रा. डॉ. प्रमोद येवले**
**कुलगुरु**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
**मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद**

**स्थळ :** विद्यापीठ प्रागंण.
**दिनांक.** ०४ मे, २०२३.